प्रासंगिक
सामना रविवार २५ जुलै २०१० | ३

बापट गुरुजी

# सद्गुरुतत्त्व

नानाविध रूपं धारण करणाऱ्या सृष्टीमागे एकमेवाद्वितीय म्हणजे त्यासारखी एकच, दुसरी नाही अशी एक शाश्वत सत्ता आहे, ज्याला 'आत्मतत्त्व' असे हिंदुस्थानी अध्यात्माने नाव दिले आहे. जसा सूर्याचा आधार घेऊन चंद्र प्रकाशतो, त्याप्रमाणेच त्या एका मूळ तत्त्वाच्या आधारे ही सृष्टी विविध रूपांनी नटते.

आत्मानुभव हा प्रत्ययाचा प्रांत असल्याने आत्मतत्त्वाचे नक्की



वर्णन शब्दांत करता येत नाही. लेखणी आणि वाणी दोन्ही त्याचं वर्णन करायला असमर्थ आहेत. समजा, काशी विश्वेश्वराचं मंदिर बघून आलेल्याला विचारलं की, 'मंदिर कसं आहे?' तोही सांगेल, 'छान आहे!' परंतु जोपर्यंत प्रत्यक्ष अनुभूती येत नाही तोपर्यंत तो 'छानपणा' मनाला पूर्णत: पटणं अतिशय अवघड असतं. ज्याने गोड चव कधी अनुभवलीच नाही त्याला साखर गोड आहे म्हणजे नक्की कशी हे शब्दाद्वारे समजावणं अतिशय कठीण आहे. प्रत्येक वस्तूबद्दल, प्रत्येक पदार्थाबद्दल हाच न्याय आहे. तरीसुद्धा त्याच्या अर्थापर्यंत जाण्यासाठी काही ना काही प्रकारे शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न आपण करतो. त्याचप्रमाणे निर्गुण-निराकार आत्मतत्त्वाचं स्वरूप सांगण्यासाठी त्याला तीन शब्दांत बद्ध करण्याचा प्रयत्न अध्यात्माने केला - 'सत्', 'चित्' आणि 'आनंद्'!

'सत्' म्हणजे अस्तित्व. जे त्रिकालाबाधित आहे ते म्हणजे 'सत्'. त्याला जन्म नाही आणि मृत्यूही नाही. सामान्य मनुष्य सत्यतेचा एकच निकष लावतो, 'दृष्टीला जे दिसेल ते सत्य!' दृश्य असणाऱ्या सर्व वस्तू व्यावहारिक दृष्टीने खऱ्या असल्या तरी 'सत्'च्या व्याख्येत येत नाहीत. कारण त्या वस्तू काळाने बांधत आहेत. यथाकाळ त्यांचा नाश होतो. म्हणूनच त्यांच्यापासून मिळणाऱ्या आनंदाचाही कालांतराने नाश होतो. म्हणजे तो आनंदही अशाश्वत असल्याने खोटा ठरतो. आपल्यासहित सर्व वस्तू नाशवंत असल्या, तरीही दृष्टीपलीकडील हे 'सत्' प्रत्येकात आहे. जेव्हा एखादा मृत्यू पावतो, तेव्हा आपण म्हणतो की, 'तो अमुक गेला!' परंतु त्याचा देह तर समोरच असतो, मग जो गेला तो कोण होता? म्हणजेच अनाहूतपणे आपण मान्य करतो की, जाणारा हा त्या नाशवंत देहापेक्षा निराळा होता. मृत्यूसमयी देह सोडून जाणारं तत्त्वच 'सत्' होय, जे आपल्यापैकी प्रत्येकात विराजमान आहे!

'चित्' म्हणजे जाणण्याची शक्ती. त्रिकालाबाधित असलं तरी 'सत्य' एकटं काही कार्य करू शकत नाही. त्यासाठी त्याच्याबरोबर चैतन्य असलं पाहिजे. या चेतनेलाच 'चित्' असं म्हटलं आहे. तर 'आनंद' हे निर्गुण आत्मतत्त्वाचे स्वरूप आहे. स्वरूप याचा अर्थ सुस्वरूप, स्वरूपवान असा नव्हे. जे दिसतं ते रूप म्हणजे स्वरूप नव्हे. स्वरूप म्हणजे सहज स्वभाव, ज्यामध्ये ती वस्तू स्वत:ला सतत स्थिर करण्याचा प्रयत्न करत असते. उदा. पाणी गरम करून ओतून ठेवलं तर थोड्या वेळाने आपोआप थंड होऊ लागते. कारण 'शीतलता' हे पाण्याचं स्वरूप आहे. काहीही करा, ते मूळ स्वरूपावर येणार. त्यासाठी त्याला बाह्य कारणाची अपेक्षा नसते आणि आवश्यकताही नसते. त्याचप्रमाणे निर्गुण निर्विकार आत्मतत्त्व आनंदस्वरूप आहे, तिथे दु:खाचा लवलेशही नाही. पूर्ण आनंद! फक्त आनंद आणि आनंद! दुसरं काही नाही. प्रत्येक व्यक्ती आनंद मिळविण्याचा आयुष्यभर प्रयत्न करीत असते ते या स्वरूपामुळेच.

गंमत अशी की, 'सत्', 'चित्' आणि 'आनंद्' हे एकेकटे शब्द आत्मतत्त्वाचं वर्णन करू शकत नाहीत. फक्त 'सत्' म्हटलं तर अस्तित्व असलेल्या कोणत्याही गोष्टीला आत्मतत्त्व म्हणावं लागेल. नुसतं 'चित्' म्हटलं तर ज्ञानेंद्रियांच्या कोणत्याही जाणिवेला आत्मा म्हणावं लागेल आणि केवळ आनंद म्हटलं तर इंद्रियजन्य कोणत्याही आनंदाला आत्मा म्हणावं लागेल. म्हणूनच या तिन्ही शब्दांचा उपयोग आत्मतत्त्वाचं वर्णन करण्यासाठी एकत्र केला जातो 'सच्चिदानंद'!

निर्गुणाची उपासना सहजसाध्य नाही. म्हणूनच उपासनेसाठी काहीतरी गुणात्मक वस्तूचा आधार घ्यावा लागतो. जन्मोजन्मींच्या अनुचित संस्कारांमुळे आपण स्वत:तील आत्मतत्त्व, आपल्यातील गुरुतत्त्व ओळखू शकत नाही. म्हणूनच प्रथम पायरीवर देहाच्या बाहेर, कुठल्यातरी सगुण देहामध्ये असलेल्या गुरुतत्त्वाची भक्ती करता आली पाहिजे. सगुण भक्तीची सत्ता इथे सुरू होते. 'सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे!' या समर्थ उक्तीप्रमाणे आपल्या देहाबाहेरील दुसऱ्या देहावर गुरुतत्त्वाचं श्रद्धापूर्वक आलंबन घेऊन पूजा, अर्चा, भक्ती केल्यानंतर तो भक्त कालांतराने आपल्या स्वत:च्याच देहातील गुरुतत्त्व ओळखायला लागतो. परीस जसा लोखंडाला सोनं बनवतो तसंच भक्तालाही आपल्याप्रमाणे समर्थ बनवणे, हे सद्गुरू तत्त्वाचे सामर्थ्य असते. या क्रियेत सद्गुरू स्वतंत्र काही करतो असे नाही तर ती शिष्याच्या इच्छेच्या तीव्रतेप्रमाणे व त्याच्या आत्मशोधाच्या प्रयत्नांप्रमाणे आपोआप घडणारी प्रक्रिया असते. अनादी अनंत काळापासून, गुरू-शिष्य परंपरेच्या माध्यमातून सच्चिदानंद सद्गुरू तत्त्व सर्व भूतांना आनंद प्रदान करण्यासाठी या भूमीवर कार्यरत आहे व जोपर्यंत विश्वात 'सबाह्य अभ्यंतरी' पूर्ण समता प्रस्थापित होत नाही तोपर्यंत हे कार्य चालूच राहील हे निर्विवाद सत्य आहे! ■